दिनांक- २७/०३/२०२५

## - : प्रेस नोट :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
गुन्हा नोंद क्र. २०/२०१८, कलम- ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.अधिनियम १९८८ सह कलम १०९ भा.द.वि.
विशेष खटला क्र. ११४३/२०२०

आरोपी - १) श्री. अशोक रोकडे, कामगार/ श्रमिक, एफ/दक्षिण विभाग, मनपा, मुंबई
२) श्री. नितीन जाधव, दुय्यक अभियंता, एफ/दक्षिण विभाग, मनपा, मुंबई
३) श्री. सज्जाद जब्बर खान, खाजगी इसम
यांनी लाच स्विकारल्या प्रकरणी ५ वर्षे सक्त मजुरी व रू. ५०,०००/- दंडाची शिक्षा

यातील आरोपी लोकसेवक यांनी लोकसेवक पदाच्या नात्याने काम करतांना फिर्यादी यांचेकडुन त्यांचे ओळखीच्या लोकांच्या झोपडया पात्र करून नविन योजनेतील सदनिकांचे मुळ वितरणपत्र देण्यासाठी प्रलोभन म्हणून कायदेशीर परिश्रमाखेरीज पारितोषन म्हणून रु. ५०,०००/- ची लाच मागून सापळा कारवाईदरम्यान रु. ५०,०००/- लाच स्विकारले म्हणून ला.प्र.वि., मुंबई विभागाकडुन गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. विशेष सत्र न्यायालयात उपरोक्त नमूद आरोपी यांचेविरूध्द विशेष खटला क्र. ११४३/२०२० अन्वये दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ४६ येथे झाली असता, सुनावणी अंती लोकसेवक आरोपी विरूध्द आरोप सबळ पुराव्यानिशी सिध्द झाल्याने दिनांक २७/०३/२०२५ रोजी मा. न्यायालयाने नमुद आरोपीस प्रत्येकी ५ वर्षे सक्त मजूरी व रू. ५०,०००/- दंड.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. आ.टी.ठेंगले, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. वैभव पाटील, पोलीस निरीक्षक श्री. विनोद पाटील व पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र चव्हाण यांनी केला. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. प्रभाकर तरंगे यांनी काम पाहिले.

सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
सत्यमेव जयते

27/03
( सचिन जाधवर )
अति. कार्यभार सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबधंक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in,
**ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net